
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-38, Vol-07 April to June 2021



Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

VYAPARI SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
April To June 2021
Issue-38, Vol-07

14) ORDER OF FURTHER INVESTIGATION
VISHAL TYAGI ||67

15) A STUDY OF AWARENESS TOWARDS CYBERCRIME AMONG THE 9TH STD ...
Pooja Savla & Dr. Prasad S. Gurao, Mumbai ||71

16) CASE STUDY OF PROBLEMS IN ROUTINE IMMUNIZATION OF CHILDREN IN ...
Dr. Sujata Pawar & Madhavi Shukirbaba Sarvade, Satara ||74

17) Importance of Yoga in Student's life
DR. MENAKARANI SAHOO, Cuttack, Odisha, India ||82

18) सविनय कायदेभंग चळवळीत अमरावती जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान
डॉ. नितीन वसंतराव चांगोले, अमरावती ||86

19) उच्च प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांना चित्रकला विषयांच्या अध्ययनात येणाऱ्या ...
श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव, जि.हिंगोली, महाराष्ट्र ||89

20) वाढते नागरीकरण आणि आणि सामाजिक जीवनावरील प्रभाव
डॉ.दांडगे एल.जी., ता.जि.औरंगाबाद ||92

21) इरावती कर्वे यांच्या ललित निबंधातील चिंतनात्मकता
प्रा.शैला जगदंबे, नांदेड ||95

22) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाची वाटचाल : एक दृष्टिपात
प्रा.डॉ.कुंभारकर के.जी., जि.लातूर ||99

23) महात्मा बसवेश्वरप्रणीत नागरी समाज
प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव, जिल्हा.नांदेड (महाराष्ट्र) ||103

24) भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात मराठी वृत्तपत्रांची भूमिका
डॉ.प्रगती बी. भारकवार, नाशिक ||106

25) लिटल मॅगॅझिन्स चळवळ आणि राजा ढाले
डॉ. नरवाडे जळबा मेश्राम, जि. जालना ||108

26) कोरोना नंतरचे शिक्षण
ताई पवार, जि.अ.नगर ||111

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

April To June 2021
Issue-38, Vol-07

0103

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

23

# महात्मा बसवेश्वरप्रणीत नागरी समाज

प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
पदवी व पद्व्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर,
जिल्हा.नांदेड (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

प्रस्तावित शोध लेखाचा उद्देश नागरी समाजची संकल्पना समजून घेणे हा आहे. तसेच महात्मा बसवेश्वर नागरी समाजाचे प्रणेते कसे आहेत,हे जाणून घेणे. महात्मा बसवेश्वरांच्या जीवन,व्यक्तिमत्व, विचार व आचारातून नागरी समाजास प्रेरणादायी ठरणाऱ्या बाबीची उकल कशी होते ते स्पष्ट करणे. नागरी समाजाच्या निर्मितीसाठी बसवेश्वरांनी कोणत्या साधनाचा वापर केला हे जाणून घेणे. महात्मा बसवेश्वर प्रणीत नागरी समाजाची लक्षणे कोणती ते पाहणे. आधुनिक लोकशाही शासन व भांडवलवादी व्यवस्थेने नव संकल्पना व मूल्यांना जन्मास घातले आहे. यातील अनेक संकल्पना व विचाराने लोकशाहीला अधिक बळकट केले.तर भांडवली व्यवस्थेची पाळेमुळे अधिक मजबूत केली. तर दुसऱ्या बाजूने भांडवली व्यवस्थेचा बुरखा फाडणारी शस्त्र व साधने हि निर्माण केली. २० व्या शतकात भांडवली व्यवस्था आपले हस्तक समाजातील अनेक भागात निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे.

**नागरी समाजाचा अर्थ :**

१९९० च्या दशकात जागतिक मंच्वर नागरी समाज या संकल्पनेचा उदय झाला. या काळात नागरी समाज हि संकल्पना लोकशाही समाजाचा महत्वाचा गुणधर्म आहे. तसेच लोकशाही नीट चालावी यासाठी काळजी घेणे व लोकशाही अधिक लोकशाहीवादी बनवणे यासाठी काळजीपूर्वक प्रयत्न करणे नागरी समाजाचे कार्य आहे. नागरी समाज हि आधुनिक युगात सामाजिक शास्त्रात संकल्पना म्हणून उदयास आली. ती अनेक प्रकारच्या भिन्न भिन्न सामाजिक संस्था, आंदोलने मंडळे यांच्या संदर्भाने वापरली जाते . नागरी समाज हि संकल्पना युरोपीय प्रबोधनोत्तर युगाचे फलित आहे असे मानतात.हा नागरी समाज उदारमतवादी लोकशाही समाजाच्या प्ररुपाशी जोडलेला असतो. आधुनिक युगात नागरी समाजाच्या संकल्पनेची नाळ हेगेल,कार्ल मार्क्स दृएंजेल्स व ग्राम्सी च्या लेखनाशी जोडलेली आहे. नागरी समाज म्हणजे प्रचलित भांडवली संबंधाचे दुसरे रूप आहे. आर्थिक ध्येय साध्य करण्यासाठी नागरी समाजच वापर भांडवलदार करतात असे मार्क्स म्हणतो .परंतु त्याचे प्रतिबिंब प्राचीन ग्रीक विचारात जाणवते. नागरी समाज हि संकल्पना प्राचीन ग्रीक व रोमन तत्वज्ञानातुन आली आहे. ग्रीक तत्वज्ञ सौक्रेटीसने लोकांच्या चांगल्या जीवनास सुनिश्चित करण्यासाठी नागरी समाज अनिवार्य असल्याचे मत मांडले. प्लेटोच्या मते नागरी समाज म्हणजे न्यायसंगत समाज म्हणतो. ज्यात सर्वसामान्य जनतेचे हित विवेक,साहस, संयम,आणि न्याय इत्यादी नागरिक सद्गुणाप्रती समर्पित आहे. प्राचीन युगात नागरी समाज म्हणजे उत्तम समाज ,चांगला समाज असे विवेचन केले आहे. ग्राम्सी च्या मते समाजातील विषमताचे प्रतिबिंब नागरी समाजात पडते व त्या सामाजिक—आर्थिक विषमतांचे पुनरुत्पादन नागरी समाज करतो. तसेच नागरी समाज त्या—त्या समाजातील सत्ताधारी वर्गाचे संबंध जोपासणारा, सरकारची तळी उचलणारा असतो. या शिवाय काहींनी नागरी समाज म्हणजे शोषित, मुक व्यक्तीचा,समूहाचा विद्रोही आवाज असतो. नागरी समाज म्हणजे मुक्तिदायी लढ्याची जागा असतो. तर हेगेलने कुटुंब संस्था व राज्य संस्था या डोहोमधील सामाजिक अवस्थेसाठी नागरी समाज हि संज्ञा वापरली आहे. अडम स्मिथ म्हणतो नागरी समाजात सर्वांच्या भल्याचा विचार करणारी एक अंगभूत बुद्धी असते कि जिच्याद्वारे सार्वजनिक हित साधले जाते.नागरी समाज हा समता,न्याय आणि स्वातंर्त्य यांच्या रक्षणासाठी संघर्ष छेडणारा असतो .

**नागरी समाजातील सहभागी घटक :**

नागरी समाजात अराजकीय संघटन, समुदाय



Scanned by CamScanner

आधारित संघटन,धार्मिक संघटन,सहकारी संस्था,महिला संघटन, युवा संघटन,समाज सुधारणा आंदोलन, सामाजिक कु–प्रथा सुधारणा करणारे आंदोलन, भ्रष्टाचार विरोधी आंदोलन,कामगार व शेतकऱ्यांचे संघटन, मानवी हक्काचे रक्षक, बुद्धीजीवी आणि विचारवंत, समाजसेवक,वकील आणि कार्यकर्ते, बॉलिवूडमधील चमकते सितारे पत्रकार या सर्वांना समावेश होतो .

**महात्मा बसवेश्वर कालीन स्थिती :** बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांचा जन्म २५ एप्रिल ११०५ साली चालुक्य साम्राज्यातील बागेवाडी गावात मादिराज व मादूलांबिका या दांपत्याच्या पोटी झाला. ज्याचा समावेश आजच्या उत्तर कर्नाटकात होतो.भारतीय इतिहासात मध्ययुग अंधकार युग म्हणून ओळखले जाते. राजेशाही व सरंजामशाहीचे प्रस्थ होते. चातुर्वर्ण्य व वैदिक व्यवस्था समाजाच्या सर्व अंगांना प्रभावित केले होते. शिक्षण व ज्ञान निर्मिती समाजाच्या विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. समाजातील अभिजनाच्या हिताला व कल्याणाला प्राधान्य देणारी समाज, राज्य व अर्थ व्यवस्था होती. अंधश्रद्धा, गुलामगिरी,विषमता,शोषण, अनैतिकता, अमानवता, मानवी हक्कांचे हनन, राजेशाही व सरंजामशाही वैदिक व्यवस्थेची बटिक होती, स्त्री–पुरुष विषमता,कर्मकांड,दैववाद,बहुदेवोपासना इत्यादी समाजाचे लक्षण होते. अश्या परिस्थितीत महात्मा बसवेश्वरांनी नागरी समाजाची निर्मिती व बांधनी केली.

**महात्मा बसवेश्वरांची नागरी समाजाच्या निर्मितीची साधने :**

बाराव्या शतकातील जुलमी व अत्याचारी व्यवस्थेत महात्मा बसवेश्वरांनी लोकशाही प्रणीत नागरी समाजाचा नंदादीप फुलवला. नागरी समाजाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी खालील साधनांचा समर्थपणे व सक्षम व यशस्वी बापर केला आहे. व्यक्तीच्या सामाजिक दृआर्थिक व राजकीय विचार व वर्तनात व आध्यात्मिक जीवनात सुधारणा व्हावी म्हणून अष्टावरण (गुरु,लिंग जंगम,मंत्र,प्रसाद, पादोदक,विभूती व रुद्राक्ष ) पंचाचार (लिंगाचार,सदाचार, गणाचार,भृत्याचार,शिवाचार) व आध्यात्मिक उन्नतीसाठी षटस्थल (भक्तस्थल,महेशस्थल,प्रसादस्थल, प्राणलिंगीस्थल, शरणस्थल व ऐक्यस्थल) यांची रुजवण समाजात केली. या शिवाय शरण–शरणी,अनुभव मंटप,कायक वे कैलास, दासोह,अरीवे गुरु,ईष्टलिंग,वचन साहित्य यांच्या माध्यमातून बसवेश्वरांनी लोकशाही व मानवी मुल्यांची आरास उभी केली.

**महात्मा बसवेश्वर प्रणीत नागरी समाज :**

वरील सर्व साधनांचा वैचारिक बुद्धिमत्तेच्या आधारावर समाज व राज्य व्यवस्थेत बदल केला. बाराव्या शतकातील जुलमी,भ्रष्ट व अनैतिक समाजात मानवी मूल्यावर आधारित नागरी समाज घडवला. महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेला समाज नागरी समाज होता. कारण त्यांच्या समाजाची मूल्य व्यवस्था आधुनिक युगातील नागरी समाजापेक्षा अति उच्च दर्जाची व श्रेष्ठ होती. मुल्ये त्यांनी घडवलेले शरण दृशरणी नागरी समाजाचे वाहक होते. महात्मा बसवेश्वरांचे संपूर्ण जीवन चरित्र व व्यक्तिमत्व विवेक व मानवी मूल्याने ओतप्रोत भरलेले होते. त्यांच्या विलोभनीय व समाजभिमुख व्यक्तिमत्वातून लोकशाहीवादी नागरी समाजास आवश्यक सर्व सद्गुण अभिव्यक्त होतात. शरणू शरणार्थी या नम्रतापूर्ण अभिवादनातून माणसांना जोडण्याचे कार्य केले. सुयोग्य व सुसंघटीत समाज घडवण्यासाठी मंदिर,पुजारी संस्कृती नाकारून देहच देवालय व जंगम व्यवस्था निर्माण केली. सर्वांना माणूस म्हणून ओळखणाऱ्या समताधिष्टीत तत्वज्ञानाची निर्मिती वचन साहित्याच्या माध्यमातून केली. वचन साहित्य नागरी समाजाची आचारसंहिता होती. कारण त्यांनी वचन साहित्याच्या माध्यमातून हा कोण ? हा कोण ? हा कोण ? असे म्हणवू देवू नका असा भाव हि माझ्या मनी येवू देवू नका हा आमुचा हा आमुचा हा आमुचा असेचि म्हणवा कुडलसंगमदेवा.हा लोकशाहीवादी विचार रुजवला. महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केलेला समाज खालील आचारसंहितांचे पालन करून जगणारा होता. स्त्री दृपुरुष समान आहेत. कोणतीही व्यक्ती जन्माने,लिंगभेदाने, वर्णभेदाने किंवा व्यवसायाने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही.पुरुष दृपुरुष किंवा स्त्री–पुरुष यात कोणताही भेद नाही.स्त्रियांना पुरुषा संखीच आपली उन्नती करून घेण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाने स्वेच्छेने आपल्या व्यवसायाची निवड करावी. स्त्रियांसुद्धा आपल्या आवडीचे कायक म्हणजेच कार्य



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

*Vidyawarta®*
Peer-Reviewed International Journal

April To June 2021
Issue-38, Vol-07



करण्याचा अधिकार होता.सर्वच व्यवसाय प्रतिष्ठेच्या दृष्टीने समान आहेत.जात वर्ण व आश्रमातील भेदाचा त्याग करावा.श्रेष्ठ कनिष्ठता पाळू नये.आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास आपल्या कायकातून घडवावा. धार्मीसाठी,लिंगारचनेसाठी सर्वसंग परित्याग करून अरण्य वसत जाण्याची गरज नाही.आंतरजातीय विवाह आणि सर्व जातीवर्णातील समूह भोजनास उत्तेजन देण्यात यावे. अस्पृश्यतेला समाजात कोणतेही स्थान नाही.प्रत्येक मानवाला आध्यात्मिक आणि सामाजिक प्रश्नाबाबत मुक्त चिंतन करण्याची मुभा आहे.कायक आणि अनुभव हे मार्गदर्शक तत्व मुक्त चिंतनासाठी आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी आहे.धार्मिक शिक्षणासाठी लोकभाषा उत्तम मध्यम आहे.सर्व व्यक्तींना आत्मिक उन्नतीसाठी आध्यात्मिक चर्चेत भाग घेण्याचा सारखाच अधिकार आहे.

महात्मा बस्वेश्वरांची हि आचारसंहिता लोकशाही मूल्य समाजात रुजवणारी होती. न्यायसंगत व उत्तन समाजाचे प्रारूप होते. समाजातील सर्वांच्या भल्याचा विचार त्यात होता. मानवी हक्काची रुजवणूक करणारा विचारवंत व बुद्धीजीवी याचे पालन करत होता. त्यामुळे या तत्वाचे पालन करून जगणारा समाज हा नागरी समाज असतो. महात्मा बसवेश्वरांच्या या तत्वाचे पालन करणारे सर्व स्त्री दृपुरुष म्हणजेच शरण शरणी ज्ञानी,आचारसंपन्न,सदाचारी व सद्गुणी होते. तत्कालीन शोषित, मुक व्यक्तीचा,समूहाचा हा विद्रोही आवाज होता. ज्या आवाजाने समकालीन सरंजामशाही व राजेशाहीची वाटचाल लोकशाहिच्या दिशेने सुरु झाली होती.

दारिद्र्य,अज्ञान,बेकारी,उपासमार, शोषण,विषमता, गुलामगिरी,अस्पृश्यता हे तत्कालीन व्यवस्थेत जीवन जगणाऱ्या शुद्र ,कामगार,शोषित,वंचित,बहुजन समाजाचे प्रश्न होते.महात्मा बसवेश्वरांनी कर्णिक,अर्थमंत्री व प्रधानमंत्री तसेच अनुभव मंटपात कार्य करताना तत्कालीन समाजाचे प्रश्न घेऊनच कार्य केले. तसेच याच प्रश्नावर काम करणारी आधुनिक संसदरुपी अनुभवमंटपाची स्थापना केली. ज्यात ७७० शरण–शरणी व १९६००० जंगम जातीअंताचे समाजकारण,सुयोग्य व सुसंघटीत समाज निर्माण,सामाजिक व धार्मिक सुधारणा,उदारमतवादी लोकशाही, मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी संघर्ष करत होते. परंतु त्यांचा हा संघर्ष अहिंसा,शांतता व लोकशाही मार्गाने होता. तसेच तो समकालीन सरंजामशाहीच्या किंवा सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधाची जोपासना करणारा किंवा त्याशी हात मिळवणी करणारा नव्हता. उलट त्यांच्या शोषणाधिष्टीत व विषमतावादी विचार व आचारात नैतिक मार्गाने सकारात्मक बदल घडवून त्यांचे मन व बुद्धी नागरी समाजास पोषक बनवणारा होता. म्हणून महात्मा बस्वेश्वरांचा नागरी समाजाचा सिद्धांत आजच्या भांडवली व्यवस्थेचे बाहुले बनलेल्या नागरी समाजास मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतो.

**संदर्भ ग्रंथ**

नागरी समाज आणि भारतीय लोकशाही — Indian Streams Research Journal — लेख डॉ. संगमेश्वर नीला — मार्च २०१६

महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान : डॉ. वेदप्रकाश डोणगावकर —२०११

तांबे श्रुती : नागरी समाजाच्या पुनर्व्याख्याची गरज,परिवर्तनाचा वाटसरू —२०११

सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा कोश राज्यशास्त्र : डॉ.बी.आर.जोशी —२००७

❑❑❑

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded



Scanned by CamScanner